# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

परिपत्रक क्रमांक : ००७६५१ / मराठी भाषा समिती (ड-१७)

विधान भवन, मुंबई.

दिनांक :१६ जानेवारी, २०२३.

**संदर्भ :** मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र. मभापं-२०२२/प्र.क्र.१२७/भाषा -२, दि. ११ नोव्हेंबर, २०२२.

## :: प रि प त्र क ::

सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना कळविण्यात येते की, मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी व तिचे संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विद्यमाने "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" दिनांक २३ आणि २४ जानेवारी, २०२३ रोजी साजरा करण्यात येणार आहे. सोमवार, दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ मराठी ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार असून, मंगळवार दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० ते सायं. ५.३० या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे (कथाकथन/काव्यवाचन/गझलवाचन/एकपात्री प्रयोग) आयोजन करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाचे प्रक्षेपण या सचिवालयाच्या **https://www.youtube.com/c/MAHARASHTRALEGISLATURESECRETARIAT/Playlists** या यु टयुब चॅनेलवर **व "महाराष्ट्र विधानमंडळ मराठी भाषा समिती" या फेसबुक अकाऊंटवर** करण्यात येणार आहे.

### :: कार्यक्रम ::

(१) **सोमवार, दिनांक २३ जानेवारी २०२३ – मराठी भाषेतील विविध ग्रंथ/ पुस्तकांचे प्रदर्शन**

विधान भवन, मुंबई इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ (मेन पोर्च) उद् वाहनाजवळील (लिफ्टजवळील) मोकळया जागेत मराठी भाषेतील विविध ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन "ग्रंथालय" कक्षाकडून करण्यात येणार आहे.

(२) **मंगळवार, दिनांक २४ जानेवारी २०२३ – कार्यक्रमाचे उदघाटन –**
**कथाकथन/काव्यवाचन/गझलवाचन/एकपात्री प्रयोग (मराठी भाषेमध्ये) इत्यादी--**

मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्या शुभहस्ते व श्री. विलास आठवले, उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्या उपस्थितीमध्ये मध्यवर्ती सभागृह, ५ वा मजला,विधान भवन, मुंबई येथे कार्यक्रमाचे उदघाटन होणार आहे.

तसेच या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी गझलवाचन/कथाकथन/काव्यवाचन/एकपात्री प्रयोग (मराठी) यामध्ये सहभागी व्हावयाचे असून इच्छुकांनी आपली नावे, संबंधित माहितीसह (प्रत्येकी तीन प्रतीत) ड-१७ (मराठी भाषा समिती) कक्ष यांच्याकडे दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वा त्यापूर्वी नोंदवावीत.

**"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" या कार्यक्रमाकरिता या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य आहे.**

( विलास आठवले )
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति :**

सर्व अधिकारी/कर्मचारी.

**याची प्रत :**

१. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद /महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
५. महाराष्ट्र विधानसभेचे/विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
७. कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, ग-२ कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
८. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.
९. विधिमंडळाची सर्व पक्ष कार्यालये.
१०. संगणक कक्ष (Website)
११. सुरक्षा विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
१२. अग्निशमन विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
१३. निवड नस्ती.